




दैनिक

# सह्याद्रीचा राखणदार

www.sahyandrinews.com

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • २४३ • RNI : MAHMAR/2023/87818 • गुरुवार दि.१० जुलै २०२५ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.



Agro. Tourism & Adventure Park
कृषी पर्यटन व ॲडव्हेंचर पार्क


## मराठी भाषिकांसाठी आनंदाची बातमी

# केंद्रीय गृह मंत्रालय मराठीतून आलेल्या पत्रांना आता मराठी भाषेतूनच उत्तर देणार

### संसदीय राजभाषा समितीच्या बैठकीत निर्णय; राज्यातील महायुती सरकारला देखील दिलासा

मुंबई (वृत्तसंस्था)–महाराष्ट्रातील राजकारण सध्या मराठी विरुद्ध हिंदी या मुद्द्यावरून तापलेले आहे. या दरम्यान केंद्रीय गृह मंत्रालयाने एक मोठा निर्णय घेतला आहे. केंद्रीय गृह मंत्रालय मराठीतून आलेल्या पत्रांना आता मराठी भाषेतूनच उत्तर देण्यात येणार आहे. संसदीय राजभाषा समितीच्या बैठकीत समितीचे नियंत्रक खासदार डॉ. दिनेश शर्मा यांनी ही माहिती दिली. केंद्रीय गृह मंत्रालयाने जाहीर केलेला हा निर्णय महाराष्ट्रातील मराठी माणसासाठी आनंदाचा मानला जात आहे.राजभाषा समिती देशातील प्रादेशिक भाषांना चालना देण्याचे काम करते. हिंदी भाषेला सहयोगी भाषा म्हणून इतर भाषांना प्रस्थापित करणे यासाठी या समितीचे प्रयत्न असतात. सध्या गृह मंत्रालयातील संपूर्ण कामकाज हे हिंदी भाषेमध्ये होत आहे. त्यातच आता मराठी भाषेतील पत्रांना मराठी भाषेतूनच उत्तर देण्यात येईल, तसेच तामिळ भाषेतील पत्रांना देखील तामिळ मधूनच उत्तर देण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याचे डॉ. दिनेश शर्मा यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितले.



### राज्यातील महायुती सरकारला देखील दिलासा

राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारला मराठी विरुद्ध हिंदी या मुद्द्यावरून घेरण्याचा प्रयत्न विरोधक करत आहेत. यातच आता केंद्रीय गृह मंत्रालयाच्या या निर्णयामुळे महायुती सरकारला देखील मोठा दिलासा मिळाला असल्याचे मानले जात आहे. फडणवीस सरकार हे मराठी भाषा विरोधी असल्याचा दाखवण्याचा प्रयत्न विरोधक करत असताना केंद्रीय गृह मंत्रालयाने हा निर्णय जाहीर केल्याने आता सरकारमधील नेत्यांना मराठीच्या मुद्द्यावर आणखी एक विषय मिळाला आहे.




### समस्त मराठी भाषिकांसाठी ही अतिशय आनंदाची बातमी–चंद्रशेखर बावनकुळे

या संदर्भात भारतीय जनता पक्षाचे नेते मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आनंद व्यक्त केला आहे. समस्त मराठी भाषिकांसाठी ही अतिशय आनंदाची बातमी असल्याचे त्यांनी म्हटले आहे. या संदर्भात आपल्या पोस्टमध्ये त्यांनी लिहिले की, 'समस्त मराठी भाषिकांसाठी अतिशय आनंदाची बातमी आहे की, मराठी पत्रांना मराठीतच उत्तर देण्याचा अतिशय महत्वपूर्ण निर्णय केंद्रीय गृहमंत्रालयाच्या वतीने घेण्यात आला आहे. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा घोषित करून पंतप्रधान आदरणीय नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने माय मराठीचा अगोदरच गौरव केला आहे. केंद्रीय गृह मंत्रालयाच्या कामकाजात करण्यात येणाऱ्या या क्रांतिकारी बदलाचा प्रत्येक मराठी भाषिक आनंदाने स्वागत करतो आहे. पंतप्रधान आदरणीय नरेंद्र मोदी जी व केंद्रीय गृहमंत्री आदरणीय अमित शहा भाई यांचे मन:पूर्वक आभार!'

---

### विमाशि संघाचे विदर्भस्तरीय धरणे आंदोलन

# शिक्षण क्षेत्रातील विविध प्रलंबित मागण्यांसाठी आंदोलन

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

राज्यातील खाजगी व स्थानिक स्वराज्य संस्थाअंतर्गत संचालित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा व खाजगी अनुदानित विजाभज, आदिवासी आश्रमशाळेतील शिक्षक – शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित समस्या सोडविण्याकरीता विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाच्या वतीने पावसाळी अधिवेशनादरम्यान ११ जुलै २०२५ रोजी शिक्षणाधिकारी (माध्य.), जि.प. चंद्रपूर कार्यालयासमोर धरणे / निदर्शने आंदोलन करण्यात येत आहे.शिक्षण क्षेत्रातील प्रलंबित समस्या सोडविण्याठी विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाच्या वतीने माजी आमदार व्ही. यू. डायगव्हाणे यांच्या मार्गदर्शनात व विमाशि संघाचे सरकार्यवाह तथा आमदार सुधाकर अडबाले व अध्यक्ष अरविंद देशमुख यांच्या नेतृत्वात शुक्रवार, दिनांक ११ जुलै २०२५ रोजी दुपारी ३ ते ५ वाजेपर्यंत नागपूर व अमरावती शिक्षण उपसंचालक यांचे कार्यालयासमोर उर्वरीत विदर्भातील सर्व नऊ जिल्ह्यातील शिक्षणाधिकारी (माध्य.) यांचे कार्यालयासमोर धरणे / निदर्शने आंदोलन करण्यात येणार आहे.

या आंदोलनात राज्यातील बोगस शिक्षक पदभरती / शालार्थ आयडी प्रकरणाचा तपास एसआयटीमार्फत करावा, राज्यातील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर व राज्य कर्मचाऱ्यांना सरसकट जुनी पेंशन योजना लागू करावी, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय, दि. १५ मार्च २०२४ यातील संचमान्यतेबाबत जाचक अटी रद्द करण्यात याव्या, १४ ऑक्टोंबर २०२४ चा शासन निर्णयानुसार अंशतः अनुदानित शाळा / तुकड्यांना अनुदान मंजूर करणे, राज्यातील अघोषित शाळा व नैसर्गिक वाढीव तुकडयांना अनुदानास पात्र घोषित करून आवश्यक निधीची तरतूद करण्यात यावी, १ नोव्हेंबर २००५ पूर्वी विना / अंशतः अनुदानित शाळा/तुकडीवर नियुक्त पण १०० टक्के अनुदान ०१ नोव्हेंबर २००५ नंतर आलेल्या कर्मचाऱ्यांना जुनी पेंशन योजना लागू करणे, राज्य कर्मचाऱ्यांप्रमाणे शिक्षकांना १०, २०, ३० वर्षाची आश्वासित प्रगती योजना लागू करण्यात यावी, नागपूर खंडपीठाने दि. १९/०७/२०२४ रोजी दिलेल्या निकालानुसार १०० टक्के अनुदानित शाळेतील वाढीव तुकडीवर दि.०१ नोव्हेंबर २००५ पुर्वी नियुक्त टप्पा किंवा अंशतः अनुदानावर असलेल्या शिक्षक–शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना जुनी पेंशन योजना लागू करण्यात यावी, आरटीई २००९ अंतर्गत खाजगी व इंग्रजी माध्यमाच्या शाळेत प्रवेशित विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काच्या प्रतिपूर्तीची थकबाकी अदा करण्यात यावी, नक्षलग्रस्त भागामध्ये कार्यरत शिक्षक / शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना एकस्तर पदोन्नती व वाढीव घरभाडे भत्ता लागू करण्यात यावा तसेच १५ टक्के नक्षलग्रस्त भत्ता सातव्या वेतन आयोगानुसार अदा करण्यात यावा यासह एकूण ३७ मागण्यांचा समावेश आहे.या धरणे / निदर्शने आंदोलनात मोठ्या संख्येने जिल्ह्यातील शिक्षक – शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन जगदीश जुनघरी, लक्ष्मणराव धोबे, विमाशि संघाचे चंद्रपूर जिल्हाध्यक्ष सुनील शेरकी, जिल्हा कार्यवाह दीपक धोपटे, महानगर अध्यक्ष दिगांबर कुरेकर, महानगर कार्यवाह सुरेंद्र अडबाले, जिल्हा पदाधिकारी, तालुका अध्यक्ष, तालुका कार्यवाह व सदस्यांनी केले आहे.


---

# धर्मांतरासंदर्भात विदेशी निधी विशेष विंग व कायदा आवश्यक

### आमदार सुधीर मुनगंटीवार यांची विधानसभेत मागणी

#### राज्यात धर्मांतर रोखण्यासाठी ठोस कायदा करण्याची बावनकुळे यांची ग्वाही

**मुंबई (वृत्तसंस्था)**–राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी वाढत्या धर्मांतर प्रकरणांविषयी विधानसभेत आज अत्यंत महत्त्वाची मागणी केली. त्यांनी सरकारचे लक्ष वेधल्यानंतर महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी धर्मांतर रोखण्यासाठी राज्यात ठोस कायदा करण्यात येईल, अशी ग्वाही दिली. मागील वर्षी महाराष्ट्रातील तब्बल १५१५ संस्थांना विदेशातून निधी प्राप्त झाला. हा निधी धर्मांतरासाठी वापरला जातो का? या संदर्भात विदेशी निधीचा तपशील अधिवेशनाअखेर पटलावर ठेवण्यात येईल का?, असे प्रश्न आ. मुनगंटीवार यांनी उपस्थित केले.



आ. मुनगंटीवार पुढे म्हणाले, 'गृह विभागावर मोठा ताण आहे. त्यामुळे अशा प्रकरणांवर तातडीने कारवाई करण्यासाठी स्वतंत्र विंग स्थापन करावी. इतर राज्यांनी धर्मांतर रोखण्यासाठी कायदे केले आहेत, महाराष्ट्रानेही पावले उचलायला हवीत. सक्तीने किंवा आमिषाने होणाऱ्या धर्मांतर थांबविण्यासाठी सरकारने पुढाकार घ्यावा असेही त्यांनी नमूद केले.या प्रश्नांना उत्तर देताना महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, सुधीरभाऊंनी उपस्थित केलेले तिन्ही मुद्दे अत्यंत गंभीर आहेत. विदेशी निधीचा स्रोत, उपयोग याची चौकशी होईल, तसेच विशेष विंग स्थापनेचाही विचार केला जाईल. अन्य राज्यांनी केलेल्या कायद्यांचा अभ्यास करून महाराष्ट्राने ठोस कायदा आणावा, अशी भूमिका त्यांनी मांडली.या तिन्ही मुद्द्यांवर मुख्यमंत्री आणि मंत्रिमंडळाच्या बैठकीत सखोल चर्चा करून, राज्यात धर्मांतर करण्याची कोणाचीही हिम्मत होणार नाही असा कायदा आणण्यासाठी प्रयत्न निच्छित करु असा विश्वास महसूल मंत्री बावनकुळे यांनी सभागृहात दिला.

---

# मुंबई महानगरपालिका जिंकण्यासाठी महायुतीचा 'मिशन महापौर' फॉर्म्युला

### ठाकरे बंधूंना शह देण्यासाठी भाजप, शिंदे आणि अजित पवार गट सज्ज

**मुंबई । विराम पवार**

मुंबई महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यातील राजकारण पुन्हा तापू लागले आहे. शिवसेना (ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी मराठी अस्मितेचा मुद्दा पुन्हा एकदा उचलून धरल्याने 'ठाकरे ब्रँड' पुन्हा चर्चेत आला आहे. दोघांनी घेतलेल्या जाहीर सभांमधून सरकारवर सडकून टीका करताना, मराठी अस्मितेच्या मुद्द्यावरून राज्य सरकारला थेट सवाल केले. त्यामुळे येणाऱ्या महापालिका निवडणुकीत मराठी व अमराठी हा मुद्दा तापण्याची शक्यता निर्माण झाली आहे.शिवसेना (ठाकरे) पक्षाचे खासदार अरविंद सावंत यांनी भाजपवर टीका करताना, राज्यात हिंदी आणि मराठी असा कृत्रिम वाद निर्माण करून राजकीय ध्रुवीकरण करण्याचा प्रयत्न भाजपकडून केला जात आहे,असा आरोप केला. सावंतांच्या या वक्तव्यानंतर या निवडणुकीचा केंद्रबिंदू हा भाषिक अस्मितेभोवती फिरणार, हे जवळपास स्पष्ट झाले आहे.

या पार्श्वभूमीवर दोन्ही ठाकरे बंधूंच्या एकत्रित जाहीर सभा आणि मिळणारा प्रतिसाद पाहता महायुतीत खळबळ उडाली आहे. भाजप, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा शिवसेना गट आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस (अजित गट) यांनी 'मिशन महापौर' या नावाने विशेष रणनिती आखण्यास सुरुवात केली आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, मुंबईतील विविध समाजघटकांच्या लोकसंख्येनुसार उमेदवारांची मांडणी करून मतांचं प्रभावी विभाजन साधण्याचा मानस महायुतीचा आहे. या रणनीतीत भाजपकडे अमराठी मतदारांपर्यंत पोहोचण्याची जबाबदारी असणार आहे. राष्ट्रवादी काँग्रेसकडे बहुजन समाजातील मतदारांशी संपर्क वाढवण्याचं कार्य दिलं गेलं असून मुख्यमंत्री शिंदेंच्या नेतृत्वाखालील शिवसेना गट पारंपरिक



मराठी मतदारांवर लक्ष केंद्रित करणार आहे. एकीकडे ठाकरे बंधू तब्बल दोन दशकांनंतर एका व्यासपीठावर एकत्र आले असून, त्यांच्यात आगामी निवडणुकीत युती होणार असल्याच्या चर्चा रंगल्या आहेत. दुसरीकडे महायुतीने ही शक्यता लक्षात घेऊन तयारी सुरू केली आहे. ठाकरे बंधूंना टक्कर देण्यासाठीच 'मिशन महापौर' या विशेष अभियानाला सुरुवात झाल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे.मुंबईतील सामाजिक–सांस्कृतिक आणि राजकीय समतोल लक्षात घेता महापालिका निवडणुकीसाठी महायुतीकडून सर्व्हेक्षण मोहीम हाती घेण्यात येणार असून, पुढच्या आठवड्यापासून सर्वच प्रभागांमध्ये इच्छुक उमेदवारांची लोकप्रियता, समाजघटकांशी जोडलेपण आणि कार्यक्षमता याच्या आधारे उमेदवारी निश्चित केली जाणार आहे.मुंबई महापालिका ही देशातील सर्वात श्रीमंत पालिका असून, गेल्या अनेक वर्षांपासून इथे शिवसेनेचा मजबूत प्रभाव राहिला आहे. मात्र शिंदे–फडणवीस सरकार स्थापनेनंतर शिवसेनेच्या परंपरागत गडांवर भाजप–शिंदे गटाने कब्जा मिळवण्याची रणनीती स्वीकारली आहे. याच पार्श्वभूमीवर 'मिशन महापौर' ही रणनीती राबवली जात आहे.राजकारणात मराठी अस्मिता, भाषिक मतांचे विभाजन आणि स्थानिक विकासाचे मुद्दे यांची सरमिसळ करत ठाकरे विरुद्ध महायुती अशी लढत रंगण्याची शक्यता आहे. त्यामुळे येणारी निवडणूक केवळ नगरपालिकेची निवडणूक न राहता, ती राज्याच्या आगामी राजकीय दिशा ठरवणारी लढत ठरणार आहे, असे राजकीय विश्लेषकांचे म्हणणे आहे.




# अंगणवाडी ताईंना मोबाईलवर ओटीपी आणि नेटवर्कचा त्रास; चिमूर येथे ९ जुलैला होणार मोर्चा

**तळोधी (बा.) । प्रणय बांगरे**

अंगणवाड्यांमधील कामकाज अधिक सुलभ व्हावे, या उद्देशाने शासनाने अंगणवाडी सेविकांना मोबाईल फोन उपलब्ध करून दिले आहेत. मात्र प्रत्यक्षात या मोबाईलवर ओटीपी मिळत नाही, नेटवर्क उपलब्ध नसते, मोबाईल हँग होतो आणि त्यामुळे आवश्यक माहिती भरणे, फोटो कॅप्चर करणे, टीएचआर वाटपाची नोंद करणे यांसारखी महत्त्वाची कामे रखडत आहेत. परिणामी, अंगणवाडी सेविकांची डोकेदुखी अधिकच वाढली असून शासनाने दिलेल्या तंत्रज्ञानाचा उपयोग होण्याऐवजी तो आता त्रासदायक ठरत आहे.याच पार्श्वभूमीवर आणि इतर प्रलंबित मागण्यांसाठी महाराष्ट्र राज्य अंगणवाडी सेविका व मदतनीस महासंघाच्या वतीने ९ जुलै २०२५ रोजी चिमूर येथील अप्पर जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात येणार आहे. ही माहिती महासंघाचे कार्याध्यक्ष इमरान कुरेशी यांनी दिली आहे. यासंदर्भात मुख्यमंत्र्यांपासून ते जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांपर्यंतच्या विविध स्तरांवर निवेदन पाठवण्यात आले आहे.महासंघाच्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, २५ एप्रिल २०२२ रोजी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार अंगणवाडी सेविकांना ग्रॅज्युइटी देणे बंधनकारक आहे. मात्र, राज्य शासनाने अद्याप या निर्णयाची अंमलबजावणी केलेली नाही. याशिवाय, सध्या शासन एकरकमी सेवा समाप्ती लाभ आणि ग्रॅज्युइटी एकत्रित देण्याचा प्रस्ताव तयार करत आहे, मात्र महासंघ या प्रस्तावाशी सहमत नाही. या दोन्ही लाभ स्वतंत्र स्वरूपात देण्यात यावेत, अशी मागणी करण्यात आली आहे.

याशिवाय, एफआरएस प्रणालीद्वारे अंगणवाडी सेविकांवर दरमहा अन्न वाटपाचे काम सोपवले गेले आहे. या प्रक्रियेमध्ये मोबाईलमध्ये ओटीपी वेळेवर मिळत नाही, नेटवर्क नसल्यामुळे माहिती अपलोड होत नाही, तसेच फोटो कॅप्चर करताना अनेक अडचणी येतात. मोबाईल सतत हँग होतो, यामुळे कामावर मोठा ताण निर्माण झाला आहे. मात्र तरीही प्रशासनाकडून हे काम करण्यासाठी दबाव टाकला जात असल्याने अंगणवाडी सेविका धास्तावल्या आहेत.

अलीकडेच आयुक्तांनी अंगणवाडी केंद्र उघडण्याची वेळ सकाळी ९.३० ते दुपारी २.३० अशी निश्चित केली असताना, प्रत्यक्षात स्थानिक प्रशासनाकडून सायंकाळी ४ वाजेपर्यंत बसण्यास सांगितले जात आहे. ही गोष्ट सेविकांच्या मानसिक व शारीरिक आरोग्यावर परिणाम करणारी ठरत आहे.महासंघाने आपल्या निवेदनात मागणी केली आहे की, शासनाने अंगणवाडी सेविकांना दरमहा १५,००० रुपये आणि मदतनीसांना ८,५०० रुपये मानधन द्यावे. पेन्शन, ग्रॅज्युइटी, स्थानिक भत्ता, प्रोत्साहन भत्ता अशा सर्व गोष्टींची तातडीने अंमलबजावणी करण्यात यावी. विशेषतः प्रोत्साहन भत्ता जुलै २०२५ पासून नेहमीच्या मानधनात समाविष्ट करण्यात यावा.या सर्व मागण्यांसाठी व शासनाच्या चुकीच्या धोरणाविरोधात आवाज उठवण्यासाठी ९ जुलै रोजी दुपारी १२ वाजता चिमूर येथे भव्य मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. या मोर्चात सर्व अंगणवाडी सेविका व मदतनीस यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन कार्याध्यक्ष इमरान कुरेशी यांनी केले आहे.

# आषाढी निमित्त आयडियल इंग्लिश स्कूल साखरवेलच्या चिमुकल्यांची भक्तिमय दिंडी

## परिसर दुमदुमला ‘विठ्ठल-नामाच्या’ गजरात

**पिशोर । जावेद शेख**



साखरवेल येथील आयडियल इंग्लिश स्कूल व भगवान गड मंदिर यांच्या संयुक्त विद्यमाने आषाढी एकादशीनिमित्त चिमुकल्यांची दिंडी भक्तिभावाने काढण्यात आली. सुशोभित फुलांच्या पालखीत विठ्ठल-रुख्मिणीचे प्रतिकात्मक रूप विराजमान होते. टाळ-मृदंगाच्या गजरात, फुगड्या व पाऊलवाट खेळत विद्यार्थ्यांनी पारंपरिक वेशभूषेत भक्तिरसात रंगलेली वाखाणण्याजोगी दिंडी साकारली.

चिमुरड्यांनी विठ्ठल-रुख्मिणी, वारकरी, पोलीस, चोपदार आदी वेशभूषा साकारून संपूर्ण परिसराला जणू पंढरपूरची अनुभूती दिली. विठ्ठल विठ्ठल, ज्ञानोबा-तुकाराम अशा जयघोषात शहरातील वातावरण भक्तिमय झाले. विद्यार्थ्यांनी संतांवर भाषणे सादर करत संतपरंपरेचा गौरव केला. दिंडी मार्गात नागरिकांनी पालखीची पूजा करून विठ्ठल-रुख्मिणीचे मनोभावे दर्शन घेतले. विठ्ठलनामाच्या गजरात परिसराचा प्रत्येक कोपरा भक्तिभावात न्हाऊन निघाल्याचे चित्र दिसून आले. या दिंडीचे यशस्वी आयोजन करण्यासाठी प्रभारी अध्यक्ष गणेश नारायण घुगे, शिक्षकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी आणि पालक यांनी विशेष सहकार्य केले.

## केंद्रीय प्राथमिक शाळा बळ्हेगावचा नावलौकिक

# एनएसएसई परीक्षेत राज्यात १७ वी रँक दोन विद्यार्थी उत्तीर्ण-तिघांना मेडल

**वैजापूर । अर्जुन शिंदे**



वैजापूर तालुक्यातील केंद्रीय प्राथमिक शाळा बळ्हेगाव येथील विद्यार्थ्यांनी एनएसएसई परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत गावाचे नाव उज्वल केले आहे. या परीक्षेत बळ्हेगाव शाळेचे दोन विद्यार्थी थेट राज्यातून १७व्या क्रमांकावर (रँक) उत्तीर्ण झाले असून तीन विद्यार्थ्यांना मेडल मिळाले आहेत.राज्यातील गुणवत्ता परीक्षांपैकी एक असलेल्या एनएसएसई परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. बळ्हेगाव शाळेतील राणी मुलताने व भागवत आप्पासाहेब सूर्यवंशी हे दोघे विद्यार्थी राज्यस्तरावर १७व्या क्रमांकावर उत्तीर्ण झाले आहेत. तसेच देवेश कुलकर्णी, वैभवी सूर्यवंशी आणि देवयानी कुलकर्णी या तिघा विद्यार्थ्यांना उत्कृष्ट कामगिरीबद्दल मेडल प्रदान करण्यात आले.

या गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव गावकऱ्यांच्या उपस्थितीत करण्यात आला. यावेळी परीक्षेचे गुणपत्रक, ट्रॉफी व मेडलचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमात शाळेचे मुख्याध्यापक तथा केंद्रप्रमुख सोनटक्के , पदविधर शिक्षक वाडिले, ठुबे , उबाळे, रणयेवळे, तांबडा तसेच शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष व सर्व सभासद उपस्थित होते.

या यशाबद्दल गावकऱ्यांनी आणि शाळेच्या शिक्षकवृंदाने विद्यार्थ्यांचे मन:पूर्वक अभिनंदन केले. भविष्यातही अशीच कामगिरी करत बळ्हेगाव शाळेचे नाव उज्वल ठेवावे, अशी शुभेच्छा सर्वजणांनी विद्यार्थ्यांना दिली.

# धामणगाव रेल्वे तालुक्यात ‘महिला राज’;६२ पैकी ३२ ग्रा.पं.वर सरपंचपद महिला राखीव

## ‘कही खुशी, कही गम’-आरक्षणात फेरबदलांमुळे राजकीय समीकरणे बदलण्याची शक्यता

**धामणगाव रेल्वे । प्रशांत मुन**

ग्रामविकास विभागाच्या सुधारित अधिसूचनेनुसार धामणगाव रेल्वे तालुक्यातील ६२ ग्रामपंचायतींच्या २०२५ ते २०३० या पंचवार्षिक कालावधीतील सरपंच पदांची आरक्षण सोडत मंगळवारी दुपारी तहसील कार्यालयात पार पडली. उपविभागीय अधिकारी (चांदूर रेल्वे) तेजश्री कोरे, तहसीलदार अभय घोरपडे, निवडणूक नायब तहसीलदार वसंत पखाले, महसूल नायब तहसीलदार प्रफुल देशमुख आणि निवासी नायब तहसीलदार निलेश डळमल यांच्या उपस्थितीत ही सोडत पार पडली. लहान मुलीच्या हस्ते चिठ्ठ्या काढत पारदर्शकतेने सरपंच पदांचे आरक्षण जाहीर करण्यात आले.

या आरक्षण सोडतीनुसार तालुक्यातील ६२ ग्रामपंचायतींपैकी ३२ ग्रामपंचायतींवर महिलांचे आरक्षण ठरले असून महिलाराज स्थापन होणार आहे. फेरबदल झाल्यामुळे कही खुशी कही गम अशी स्थिती निर्माण झाली आहे. गुडघ्याला बाशिंग बांधून बसलेल्यांची स्वप्ने धुळीला मिळाली, तर अनेकांना अनपेक्षितपणे लॉटरी लागल्याचे चित्र दिसून आले.यंदाच्या आरक्षणात अनेक लक्षणीय फेरबदल झाले असून ३३ ग्रामपंचायतींवर सर्वसाधारण आरक्षण आल्यामुळे स्थानिक राजकारण चांगलेच रंगणार आहे. देवगाव, झाडा, तळेगाव दशासर, अशोकनगर, विरुड रोंगे, अंजनसिंगी, भातकुली, तडनी, जुना धामणगाव, कासराखेडा, वीटाडा, मंगरूळ दस्तगीर, चिचपूर, दिघी महले, पीपलखुटा, हिंगणगाव या राजकीयदृष्ट्या बलाढ्य ग्रामपंचायतींमध्ये सरपंचपदाची चुरस अधिक तीव्र होणार आहे.या ठिकाणी वर्चस्व मिळवण्यासाठी गावातील मातब्बर पुढाऱ्यांची प्रतिष्ठा पणाला लागणार असून निवडणुकीमुळे गावागावांत राजकीय वातावरण तापणार, एवढे मात्र निश्चित.

# पिशोरमध्ये आषाढी एकादशीनिमित्त टाळ मृदुंगाच्या गजरात दिंडी उत्साहात साजरी



**पिशोर । जावेद शेख**

कन्नड तालुक्यातील पिशोर येथील महात्मा ज्योतिबा फुले हायस्कूलमध्ये आषाढी एकादशीनिमित्त सोमवार (दि. ७ जुलै) रोजी विद्यार्थ्यांनी टाळ-मृदुंगाच्या गजरात दिंडी काढून भक्तिमय वातावरण निर्माण केले. सकाळच्या सत्रात शाळेच्या परिसरातून निघालेल्या दिंडीने परिसरातील नागरिकांचे लक्ष वेधून घेतले.

विद्यार्थ्यांनी पारंपरिक वेशभूषा परिधान करून टाळ, मृदुंगाच्या तालावर हरिनाम संकीर्तन केले. फुगड्या, पावल्या यांसारख्या पारंपरिक खेळांमुळे दिंडीत विशेष उत्साह पाहायला मिळाला. शिक्षक व शिक्षिकांनीही विद्यार्थ्यांबरोबर सहभाग घेत आषाढीचा महिमा उलगडला.या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये सांस्कृतिक व धार्मिक मूल्यांची जोपासना करण्यात आली. शाळा व्यवस्थापनाने यासाठी विशेष आयोजन करून दिंडीच्या माध्यमातून अध्यात्म, कला आणि एकात्मतेचा संदेश दिला.

# गुणवंत विद्यार्थ्यांना बक्षीस म्हणून छत्र्यांचे वाटप ज्ञानविकास विद्यालयाचा प्रेरणादायी उपक्रम

**पिशोर । जावेद शेख**

योग्य अध्यापनानंतर विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासाची रुची निर्माण होऊन त्यात सातत्य ठेवावे, या उद्देशाने भराडी येथील ज्ञानविकास विद्यालयात नियमितपणे चाचणी परीक्षा घेतल्या जातात. या परीक्षांच्या माध्यमातून गुणवंत विद्यार्थ्यांची निवड करून त्यांना प्रोत्साहनपर बक्षिसे दिली जातात.

शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी विद्यार्थ्यांच्या पूर्वज्ञानावर आधारित वैयक्तिक चाचणी परीक्षा घेण्यात आली होती. या परीक्षेत उज्वल कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा सन्मान म्हणून पावसाळ्याचा विचार करून त्यांना छत्र्यांचे वाटप करण्यात आले. विद्यालयाच्या वतीने आयोजित या उपक्रमाला पालक व शिक्षकवर्गाचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या उपक्रमात भोसले भूमेश काकासाहेब, निकम निलेश नामदेव, स्वराज गायकवाड, गणराज शिंदे, ओम भोजने, विराज साळवे, ऋतुजा काकडे, आदित्य सुसुंद्रे, साळवे शिवानी, मुरकुटे साई, शिरसाट रविराज, आनंद गायके, रुद्र आग्रे, प्राजक्ता काकडे, प्रेरणा मुरमे, कार्तिक मुरमे, शेळके साईराज, प्रांजल मनगटे, सोहम आग्रे, सुजित खांदवे, हर्षल आग्रे, देवेंद्र निकम, प्रांजल शेळके, अनुजा चिंचपुरे, श्रावणी बिडवे, जुनेद पटेल, लक्ष्मी भोसले, रोहिणी खांदवे, भाग्यश्री घोंगटे, यश भोसले, जय शेळके या गुणवंत विद्यार्थ्यांना छत्र्यांचे वितरण करण्यात आलेया उपक्रमासाठी शाळेचे प्रमुख अशोकदादा गरुड, मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, शालेय वाहन चालक-मालक, तसेच पालकवर्गाने विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांचे मनोबल वाढवले.ज्ञानविकास विद्यालयाचा हा उपक्रम विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी प्रेरित करणारा ठरत असून, ग्रामीण भागातील शिक्षणात गुणवत्ता वाढवण्यासाठी एक आदर्श पायरी ठरत आहे.

# श्री विठ्ठल-रुक्मिणी व भगवंताच्या आशीर्वादानेच मराठा आरक्षणाचा प्रश्न सुटणार-आनंद काशीद

## वारकऱ्यांसाठी ५२५ लिटर दुधाचे वाटप;हजारो वारकऱ्यांना मिळाली सेवा

**बार्शी । निलेश उबाळे**

आषाढी एकादशीच्या निमित्ताने बार्शी येथील श्री भगवंत मंदिरासमोर वारकऱ्यांसाठी मराठा समाजाच्या वतीने ५२५ लिटर दुधाचे वाटप करण्यात आले. यामध्ये सुमारे १२,००० वारकऱ्यांना सेवा मिळाली. या सेवाभावी उपक्रमाचे आयोजन आनंद काशीद यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले.यावेळी उपस्थित वारकऱ्यांशी संवाद साधताना आनंद काशीद म्हणाले, आषाढी एकादशीच्या निमित्ताने आम्ही वारकऱ्यांची सेवा करत आहोत. या भक्तीमय वातावरणात श्री विठ्ठल-रुक्मिणी व भगवंताच्या आशीर्वादाने मराठा समाजाच्या आरक्षणाचा प्रश्न निश्चितच सुटेल, असा आम्हाला विश्वास आहे. जरांगे पाटलांनी उभारलेला लढा यशस्वी होईल, यासाठी आम्ही मनोभावे प्रार्थना करत आहोत.



काशीद पुढे म्हणाले की, निस्वार्थ भावनेतून केलेली सेवा कधीच वाया जात नाही. पांडुरंग हे नेहमीच त्याचं फळ देतो. मराठा समाजाने वेळोवेळी सर्व समाजासाठी नि:स्वार्थपणे योगदान दिलं आहे. आता याच योगदानाचं फळ आपल्याला आरक्षणाच्या रूपात नक्की मिळेल, असा आमचा विश्वास आहे.याचवेळी त्यांनी २९ ऑगस्ट रोजी मुंबईमध्ये कोट्यवधी मराठा बांधवांसह आरक्षणासाठी होणाऱ्या लढ्याच्या पार्श्वभूमीवर, या लढ्याला देखील श्री विठ्ठल-रुक्मिणी व वारकऱ्यांचा आशीर्वाद लाभो, अशी भावना व्यक्त केली.सकाळी दहा वाजल्यापासून सुरू झालेल्या दूधवाटप उपक्रमात दुपारी तीन वाजेपर्यंत सातत्याने सेवा देण्यात आली. या उपक्रमात ५२५ लिटर दूधाचे वाटप करण्यात आले.या सेवाभावी कार्यक्रमावेळी जोतीराम शिंदे, कृष्णा चिकणे, भिमराव गंभोरे, रामराजे ताकभाते, रंजीत बरडे, विकास माने, संदीप शिंदे, धनराज गरड, जयसिंग मोरे, बालाजी ठोंगे, पांडुरंग घोलप आदी मान्यवर उपस्थित होते.

# संतोष महादेव फराटे यांचा मांडवगण फराटा येथे सन्मान राष्ट्रवादी काँग्रेसच्या उद्योग विभागाच्या कार्याध्यक्षपदी निवड

**शिरूर । रमेश बनसोडे**

शिरूर तालुक्यातील मांडवगण फराटा येथील सामाजिक आणि औद्योगिक क्षेत्रात आपली स्वतंत्र ओळख निर्माण करणारे संतोष महादेव (भाऊ) फराटे यांची राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या उद्योग विभागाच्या शिरूर तालुका कार्याध्यक्षपदी नुकतीच निवड झाली. त्यांच्या या निवडीबद्दल बाभुळसर बुद्रुक येथील आदर्श सरपंच दिपालीताई महेंद्र नागवडे यांच्या हस्ते त्यांचा जाहीर सन्मान करण्यात आला.या गौरव सोहळ्याला माजी उपसरपंच महादेव भाऊ फराटे, रोहिणी संतोष फराटे, सामाजिक कार्यकर्ते सोमनाथ नागवडे, पत्रकार हनुमंत पंडित, अल्लाउद्दीन अलवी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.



यावेळी सरपंच दिपाली नागवडे म्हणाल्या, संतोष काका फराटे हे गेली अनेक वर्षे दूध व्यवसायात कार्यरत असून, प्रामाणिकपणे आणि शिस्तबद्धपणे काम करत आहेत. त्यांच्या कामगिरीची दखल घेऊन त्यांना पक्षाच्या महत्त्वाच्या जबाबदारीवर नेमण्यात आले आहे, याचा आम्हा ग्रामस्थांना अभिमान वाटतो.फराटे यांच्या निवडीसाठी राज्याचे उपमुख्यमंत्री आणि पुण्याचे पालकमंत्री अजितदादा पवार, शिरूर-हवेलीचे आमदार माऊली आबा कटके, प्रदेश उपाध्यक्ष श्रीकांत कदम, ऊर्जा उद्योग समूहाचे अध्यक्ष प्रकाशजी कुतवळ, तसेच दूध सल्लागार समिती महाराष्ट्र शासनाचे सदस्य नितीनजी गुरव यांचे मार्गदर्शन लाभल्याचे त्यांनी सांगितले.तसेच शिरूर तालुका राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष रवी बापू काळे, घोडगंगा सहकारी साखर कारखान्याचे संचालक लोकनेते दादा पाटील फराटे, सुधीर फराटे (माजी संचालक, घोडगंगा साखर कारखाना), आणि दीपक खंडागळे (तालुकाध्यक्ष) यांचेही महत्त्वाचे सहकार्य व पाठबळ लाभल्याचा उल्लेख करण्यात आला.संतोष फराटे यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले, पक्षाच्या अपेक्षेनुसार आणि मार्गदर्शकांच्या सूचनांनुसार, तालुक्यातील औद्योगिक तसेच शेतकरीवर्गाच्या समस्या प्राधान्याने सोडवण्यासाठी मी पूर्ण प्रयत्न करणार आहे.हा कार्यक्रम केवळ त्यांच्या सन्मानाचा नव्हता, तर ग्रामीण भागातील एक नवे, प्रामाणिक व कर्तव्यनिष्ठ नेतृत्व पुढे येत असल्याचेही उदाहरण होता. त्यांच्या पुढील वाटचालीसाठी सर्व स्तरांतून शुभेच्छांचा वर्षाव करण्यात येत आहे.

# सागर-एक सखा,एक सेवक,एक देवदूत

## जो अपने लिए जीता है, वो ‘साधारण’ कहलाता है, जो औरों के लिए जीता है, वो ‘सागर’ बन जाता है...

## जन्मदिवस विशेष लेख । रुग्णसेवेच्या अखंड व्रताला सलाम

कधी कधी आयुष्यात एखादी व्यक्ती अशी भेटते, की तिच्या असण्यानं तुमच्या आत काहीतरी हलतं. जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलतो, आणि माणुसकीवरचा विश्वास अधिक दृढ होतो. सागर मोहन खडसे ही अशीच एक व्यक्ती. कोसारा या मारेगाव तालुक्यातील छोट्याशा गावातून आलेला एक युवक, ज्याचं नाव घेतलं की चेहऱ्यावर स्मित येतं आणि डोळ्यासमोर एक धावता, झटणारा, रुग्णांच्या मदतीसाठी सतत तत्पर असलेला चेहरा उभा राहतो.सध्या आमदार तथा माजी मंत्री सुधीर भाऊ मुनगंटीवार यांचे वैद्यकीय सहाय्यक म्हणून सागर कार्यरत आहे. पण त्याच्या या प्रवासाची सुरुवात झाली ती एका दुःखद प्रसंगातून. आजोबांना अचानक दुर्धर आजार झाला आणि सागरला मुंबईतील हॉस्पिटलमध्ये सहा महिने मुक्काम करावा लागला. त्या काळात त्याने केवळ आपल्या घरच्यांचेच नव्हे, तर आजूबाजूच्या रुग्णांचेही दुःख अनुभवले. त्याला दिसले ते अश्रूंनी भरलेले डोळे, तुटलेली नाती, आणि रुग्णालयात बेवारस पडलेली माणसं. हाच अनुभव त्याच्या आयुष्यात वळण घेऊन आला.





तो म्हणतो, डॉक्टर नव्हतो, पण डॉक्टरांच्या अनुपस्थितीत काही केलं पाहिजे, अशी आतून धडपड व्हायची.औषधांची माहिती द्यायची, फॉर्म भरायला मदत करायची, टेस्टसाठी धावपळ करायची हे सगळं करताना त्याला उमगलं की हीच त्याची दिशा आहे. आजोबांचे उपचार संपल्यानंतर तो पुण्यात स्थायिक झाला, पण मनात मुंबईत पाहिलेली वेदना ठाण मांडून बसली होती. पुण्यात आल्यावर तो विविध रुग्णसेवक संस्थांशी जोडला गेला. पुणे आणि मुंबईतील डॉक्टर, सामाजिक संस्था, रक्तदाता, हॉस्पिटल व्यवस्थापन सर्वांशी त्याचा संपर्क निर्माण झाला. रुग्णांना मदत करणं ही त्याची दिनचर्या झाली. कुठे रक्त हवं, कुठे बेड मिळत नाही, कुणाला मोफत औषधं हवीत सागर अशा प्रत्येक ठिकाणी उपस्थित राहिला. त्याचं फोन उचलणं म्हणजे एक आशेचा शब्द.तो केवळ मदत करत नाही, तो माणसांशी संवाद साधतो मी आहे, घाबरू नका, एवढ्याश्या शब्दात तो मरणासन्न रुग्णालाही जगवतो. या लेखाचा लेखक म्हणून नव्हे, तर एक रुग्ण म्हणून मी हे सांगतो सागर माझ्यासाठी देवदूत ठरला. मी ॲनिमियामुळे पूर्णपणे खचून गेलो होतो.

**संपादक**
**आशिष घुमे**
e sahyandrinews@gmail.com

सर्व उपचार अपयशी ठरले. शरीर थकत होतं, आत्मा गळत होता. तेव्हा सागरला कळलं आणि तो पुण्याहून थेट वरोऱ्याला धावत आला. कोरोना काळ होता. सगळीकडे भीती, संकटकाळ. सागर म्हणाला, आशिष भाऊ, काळजी नको. देशातले सर्वोत्तम डॉक्टर आहेत. मी नेतो. पैसे नसले तरी चालतील. मी आहे. पैसा नव्हता, नातेवाईक माघारले होते. पण सागरने विश्वास दिला. आमदार सुधीर भाऊ मुनगंटीवार यांच्याशी संपर्क करून त्याने मुंबईत मातोश्रीजवळ बांधकाम विभागाच्या विश्रामगृहात राहण्याची सोय करून दिली. हिंदुजा, ब्रिज कँडी यांसारख्या नामांकित रुग्णालयांमध्ये उपचार झाले. जवळपास तीन महिने तो माझ्यासोबत होता. माझ्या औषधोपचाराची काळजी, डॉक्टरांशी समन्वय, मानसिक आधार सगळं त्याने दिलं. तो फक्त मित्र नव्हता तो माझा आधार होता. माझ्यासाठी देवाचा प्रत्यक्ष अवतार होता. सागरचं आयुष्य हे एका संकल्पाचं, एका संघर्षाचं आणि एका सतत चालणाऱ्या सेवाव्रताचं प्रतीक आहे. त्याचं नाव घेतलं की माणसं म्हणतात हा माणूस उपकार करत नाही, हा माणूस आपला होतो. सेवा, समर्पण, आणि संवेदनशीलतेचा तो एक सुंदर संगम आहे. आज तो आमदार सुधीर भाऊ मुनगंटीवार यांच्या मार्गदर्शनाखाली असंख्य गरजू रुग्णांना मदत करत आहे. त्या मार्गदर्शनातून त्याला अधिक व्यापकतेने काम करण्याचं बळ मिळालं आहे. सरकारी यंत्रणा, खासगी डॉक्टर, सामाजिक संस्थांशी समन्वय साधून तो अशा अनेक रुग्णांपर्यंत पोहोचतो आहे, जे पूर्णपणे निराश झालेले असतात. सागरसारखी माणसं आयुष्यात भेटणं हे भाग्य आहे. आज १० जुलै त्याचा वाढदिवस. पण त्याच्यासाठी हा दिवस केवळ केक कापण्याचा नाही. हा आहे एक नवा संकल्प करण्याचा दिवस. सेवा अधिक खोलवर रुजवण्याचा दिवस. हसऱ्या चेहऱ्याने दुसऱ्याचं दुःख आपल्या पायांखाली घेऊन चालत राहण्याचा दिवस. सागर मोहन खडसे एक सखा, एक सेवक, आणि काळोखात दिवा घेऊन उभा राहणारा एक देवदूत. त्याला वाढदिवसानिमित्त केवळ शुभेच्छा नव्हे, तर आभार मानायचे आहेत त्या प्रत्येकासाठी ज्याला त्याने उभं केलं, वाचवलं, आणि माणूस म्हणून पुन्हा नव्याने जगण्याचं बळ दिलं.रुग्णसेवा म्हणजे केवळ एक काम नव्हे, ती एक साधना आहे. आणि सागर त्या साधनेचा अखंड अग्निहोत्र करत आहे न बोलता, न गाजवता... फक्त देत राहून.

न कर्मणामनारंभान्नैष्कर्म्यं पुरुषोऽश्नुते...
(कर्म टाळून कोणीही सिद्धीला पोहोचत नाही) - भगवद्गीता

ही गीतेतील ओळ केवळ आध्यात्मिक विचार नव्हे, ती एक जीवनव्रताची शिकवण आहे.बहुतेक जण या ओळी वाचतात, काही मनात ठेवतात... पण फार थोडेच असे असतात जे ती जगतात.सागर मोहन खडसे हे त्यापैकी एक आहेत.

त्यांच्यासाठी कर्म म्हणजे औपचारिक कर्तव्य नव्हे, ते आहे निरपेक्ष सेवा, रात्री-अपरात्री धावणं, आणि नशिबाशी लढणाऱ्या माणसाच्या पाठीवर हात ठेवणं. त्याच्या प्रत्येक कृतीतून ‘कर्म’ हेच ‘धर्म’ असल्याचं दर्शन घडतं.

त्याने भगवद्गीतेचं गूढ फक्त समजून घेतलं नाही,
तर ते आपल्या प्रत्येक श्वासात उतरवलं आहे.
सागर हीच गीता जिवंत करून जगतो आहे...
क्षणाक्षणाला, रुग्णासाठी, मानवतेसाठी, निःस्वार्थपणे.

## पिशोर ग्रा.पं.च्या सरपंचपदासाठी ओबीसी आरक्षण जाहीर; राजकीय हालचालींना वेग

**पिशोर । जावेद शेख**




कन्नड तहसील कार्यालयात सोमवार (दि. ७ जुलै) रोजी पार पडलेल्या आरक्षण सोडत प्रक्रियेत पिशोर ग्रामपंचायतीच्या सरपंचपदासाठी इतर मागासवर्गीय (ओबीसी) प्रवर्गासाठी आरक्षण निश्चित करण्यात आले. यामुळे आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर गावातील राजकीय वातावरण तापले असून, संभाव्य उमेदवार, कार्यकर्ते आणि गट-तट सक्रीय होऊ लागले आहेत.

याआधी जाहीर झालेल्या अंतरिम यादीत पिशोर ग्रामपंचायतीसाठी सर्वसाधारण प्रवर्गाचे आरक्षण घोषित झाले होते. मात्र, ओबीसी आरक्षणावरील न्यायालयीन प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर अंतिम यादीत पुन्हा ओबीसी प्रवर्गासाठीच आरक्षण कायम ठेवण्यात आले आहे.

पिशोरमध्ये मागासवर्गीय समाजाचे भरीव अस्तित्व असल्याने या समाजातून यापूर्वीही नेतृत्व घडले आहे. सरला डहाके या सरपंच, तर बाळासाहेब जाधव उपसरपंच म्हणून निवडून आल्या होत्या. त्यामुळे पुन्हा ओबीसीसाठी आरक्षण जाहीर झाल्याने या समाजातील इच्छुकांना संधी मिळणार असून, त्यांची राजकीय ताकद वाढण्याची शक्यता आहे. या निर्णयामुळे गावात निवडणुकीपूर्व रंगत वाढली आहे. यंदा जनतेतून थेट सरपंच निवडला जाणार असल्याने अनेक नवोदित चेहरे राजकारणात पदार्पण करण्यास उत्सुक आहेत. निवडणुका आगामी सहा महिन्यांत जाहीर होण्याची शक्यता वर्तवली जात असून, राजकीय चर्चांना आणि गटबाजीला चालना मिळाली आहे.ग्रामस्थांकडून आरक्षणाबाबत संमिश्र प्रतिक्रिया उमटत आहेत. काहींनी सध्याच्या नेतृत्वाचे कार्य कौतुकास्पद असल्याचे मत व्यक्त केले, तर काहींनी नव्या नेतृत्वाला संधी मिळावी, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.आरक्षण सोडत प्रक्रिया तहसील कार्यालयात शांततेत पार पडली. ग्रामविकास विभागाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार संपूर्ण प्रक्रिया पारदर्शकतेने राबवण्यात आली. प्रशासनाच्या नियोजनामुळे कोणतीही अडचण निर्माण झाली नाही. आता पुढील टप्प्यात उमेदवारी जाहीर करणार कोण, गट-तट कसे रचले जाणार, आणि नेतृत्वाच्या शर्यतीत कोण आघाडी घेतो, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

## गुणवंत विद्यार्थ्यांना बक्षीस म्हणून छत्र्यांचे वाटप
### ज्ञानविकास विद्यालयाचा प्रेरणादायी उपक्रम



**पिशोर । जावेद शेख**

योग्य अध्यापनानंतर विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासाची रुची निर्माण होऊन त्यात सातत्य ठेवावे, या उद्देशाने भराडी येथील ज्ञानविकास विद्यालयात नियमितपणे चाचणी परीक्षा घेतल्या जातात. या परीक्षांच्या माध्यमातून गुणवंत विद्यार्थ्यांची निवड करून त्यांना प्रोत्साहनपर बक्षिसे दिली जातात.

शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी विद्यार्थ्यांच्या पूर्वज्ञानावर आधारित वैयक्तिक चाचणी परीक्षा घेण्यात आली होती. या परीक्षेत उज्वल कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा सन्मान म्हणून पावसाळ्याचा विचार करून त्यांना छत्र्यांचे वाटप करण्यात आले. विद्यालयाच्या वतीने आयोजित या उपक्रमाला पालक व शिक्षकवर्गाचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.या उपक्रमात भोसले भूमेश काकासाहेब, निकम निलेश नामदेव, स्वराज गायकवाड, गणराज शिंदे, ओम भोजने, विराज साळवे, ऋतुजा काकडे, आदित्य सुसुंद्रे, साळवे शिवानी, मुरकुटे साई, शिरसाट रविराज, आनंद गायके, रुद्र आग्रे, प्राजक्ता काकडे, प्रेरणा मुरमे, कार्तिक मुरमे, शेळके साईराज, प्रांजल मनगटे, सोहम आग्रे, सुजित खांदवे, हर्षल आग्रे, देवेंद्र निकम, प्रांजल शेळके, अनुजा चिंचपुरे, श्रावणी बिडवे, जुनेद पटेल, लक्ष्मी भोसले, रोहिणी खांदवे, भाग्यश्री घोंगटे, यश भोसले, जय शेळके या गुणवंत विद्यार्थ्यांना छत्र्यांचे वितरण करण्यात आलेया उपक्रमासाठी शाळेचे प्रमुख अशोकदादा गरुड, मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, शालेय वाहन चालक-मालक, तसेच पालकवर्गाने विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांचे मनोबल वाढवले.ज्ञानविकास विद्यालयाचा हा उपक्रम विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी प्रेरित करणारा ठरत असून, ग्रामीण भागातील शिक्षणात गुणवत्ता वाढवण्यासाठी एक आदर्श पायरी ठरत आहे.

## कैवल्यने नागपूरकरांना भिजवले भक्तिरसात चिंब
### राजा पंढरीचा कार्यक्रमात सुरेल मैफिलीतून रसिक मंत्रमुग्ध



**नागपूर । प्रतिनिधी**

एकीकडे शहरात सकाळपासून धो-धो पावसाची बरसात, तर दुसरीकडे सुरांच्या बरसतीने रसिकांची मनं चिंब भिजवणारा ‘राजा पंढरीचा’ हा भक्तिगीतांचा कार्यक्रम नागपूरकरांच्या मनावर गारुड करून गेला.सुरेश भट सभागृहात भर पावसातही उपस्थित रसिकांनी कार्यक्रमाची एकही जागा रिकामी ठेवली नव्हती. मूळचा नागपूरकर पण सध्या पुण्यात स्थायिक असलेला ‘मराठी इंडियन आयडल’ फेम, इंजिनीअर कैवल्य केजकर याने आपल्या सुरेल मैफिलीने रसिकांची मने जिंकली.कैवल्यसह कार्यक्रमात आघाडीच्या गायिका मधुरा कुंभार, भाग्यश्री टिकले आणि गायक यश खेर यांनी एकाहून एक भक्तिगीते सादर करत सभागृह विठ्ठलमय केले. अवघा रंग एक झाला या भावमय भैरवीने कार्यक्रमाची सुंदर सांगता झाली. कार्यक्रमाचे निवेदन नागपूरचे ज्येष्ठ निवेदक किशोर गलांडे यांनी केले, तर सूत्रसंचालन राखी जामकर यांनी अतिशय नेटकेपणे सांभाळले. या संगीतमय भक्तिरसाचा आनंद घेण्यासाठी विद्या वाचस्पती प्रा. स्वानंद पुंड आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ प्रचारक रवींद्र भुसारी हेही विशेष उपस्थित होते.भर पावसातही उपस्थित संगीत रसिकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे कार्यक्रम अधिकच भावपूर्ण झाला आणि रसिकांच्या मनात कायमचं स्थान मिळवून गेला.

## सातारा शहरातील कुख्यात गुंडाकडून गावठी पिस्तूल व दोन जिवंत काडतूस जप्त
### पोलिसांची शिताफीने कारवाई; सातारा शहर डीबी पथकाची कामगिरी

**सातारा । प्रतिनिधी**

सातारा शहर पोलिसांनी केलेल्या शिताफीच्या कारवाईत एका कुख्यात गुंडाला गावठी पिस्तूल व दोन जिवंत काडतूसांसह अटक करण्यात आली आहे. पोलिस अधीक्षक डॉ. उज्वल भोसेले यांच्या मार्गदर्शनाखाली व अपर पोलिस अधीक्षक डॉ. श्रेणी बेली यांच्या सूचनेनुसार सातारा शहर डीबी पथकाने ही कारवाई केली.



गोपनीय माहितीच्या आधारे सातारा शहरातील परितोषित हॉटेलच्या परिसरात कारवाई करण्यात आली. यामध्ये आर. एस. नं. ३२ येथील रहिवासी, विविध गंभीर गुन्ह्यांचा रेकॉर्ड असणारा गुन्हेगार राजस टिळक उर्फ निलेश उर्फ सागर काळे याच्यावर पोलिसांचे लक्ष होते. त्याने परदेशी बनावटीचे गावठी पिस्तूल बाळगल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी सापळा रचत त्याला ताब्यात घेतले.

रात्री उशिरा संबंधित आरोपी हा संशयितरित्या दुचाकीने फिरत असल्याचे लक्षात आल्यानंतर पोलिसांनी पाठलाग करत त्याला अडवले. त्याच्या अंगझडतीत त्याच्याकडून गावठी बनावटीचे एक पिस्तूल व दोन जिवंत राऊंड काडतूस मिळून आले. सदर पिस्तूल कोणाकडून आणले, कुठे वापरणार होता यासंदर्भात तपास सुरू आहे.

पोलिसांनी दाखल केलेल्या गुन्ह्यात आरोपीविरुद्ध शस्त्र कायद्यान्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे. या कारवाईसाठी पोलिस अधीक्षक डॉ. उज्वल भोसेले, अपर पोलिस अधीक्षक डॉ. श्रेणी बेली, उपविभागीय पोलिस अधिकारी श्रीराम काळे, निरीक्षक राजेंद्र जगदाळे, डीबीचे अधिकारी जानमेजय जगताप, चंदननगर परिक्षेत्राचे कर्मचारी यांचे मार्गदर्शन लाभले.

या कारवाईत पो.ना. पंकज मोहिले, पो.कॉ. सुशांत काळे, पो.कॉ. भूषण मोरे, पो.कॉ. संतोष रिठे, सागर गायके, विशाल पगारे, मट्ठींद्राज माने, सुहास कदम यांचा सहभाग होता.

## वैरागचे समाधान पवार सोलापूर जिल्हा राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे नवे जिल्हा उपाध्यक्ष

**बार्शी । प्रतिनिधी**

वैराग येथील युवा नेते समाधान पवार यांची राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या सोलापूर जिल्हा उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. ही निवड राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सूरज चव्हाण यांच्या मान्यतेने करण्यात आली असून नियुक्तीपत्र जिल्हा अध्यक्ष उमेश पाटील (अजित पवार गट) यांच्या हस्ते देण्यात आले.

या निवडीनंतर प्रतिक्रिया देताना समाधान पवार म्हणाले की, राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष अजितदादा पवार आणि प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे यांच्या विचारसरणीनुसार युवक काँग्रेसच्या माध्यमातून पक्षाचे ध्येय-धोरण जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रयत्न करणार आहे.



सामान्य जनतेच्या अडचणी सोडविण्यावर आणि पक्ष संघटन मजबूत करण्यावर भर राहील.समाधान पवार यांच्या निवडीनंतर वैराग येथे कार्यकर्त्यांनी फटाक्यांची आतषबाजी करत, गुलाल उधळून आनंद व्यक्त केला. परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, युवक कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाल्याचे चित्र पाहायला मिळाले.

## जाहीरनामा

अर्जदार राजेंद्र सर्जेराव महामूलकर, रा. सरदार पटेल वॉर्ड, ता. वरोरा, जि. चंद्रपूर यांनी दिलेल्या अर्जाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, खालील मृत व्यक्तींची मृत्यू नोंद संबंधित नगरपरिषद कार्यालयात करण्यात आलेली नाही. सदर व्यक्तींचा मृत्यू दिनांक खाली नमूद केला आहे.

१. सर्जेराव बाजीराव महामूलकर
मृत्यू दिनांक: २५/११/२०२१
मृत्यूस्थळ: राहते घरी
कायमचा पत्ता: सरदार पटेल वॉर्ड, वरोरा, ता. वरोरा, जि. चंद्रपूर

२. लीलाबाई सर्जेराव महामूलकर
मृत्यू दिनांक: २९/१०/२०१८
मृत्यूस्थळ: राहते घरी
कायमचा पत्ता: सरदार पटेल वॉर्ड, वरोरा, ता. वरोरा, जि. चंद्रपूर

भारत सरकारच्या विधी व न्याय विभागाच्या ११ ऑगस्ट २०२३ रोजी प्रसिद्ध जन्म व मृत्यू नोंदणी (सुधारित) कायदा २०२३ अन्वये सदर मृत्यूनोंद करण्याची प्रक्रिया सुरू आहे.


या जाहीरनाम्यानुसार कोणीही हरकत असल्यास त्यांनी जाहीरनाम्याच्या प्रसिद्धी दिनांकापासून ३० दिवसांच्या आत संबंधित कार्यालयाशी लेखी स्वरूपात संपर्क साधावा.

**:: अर्जदार ::**
**राजेंद्र सर्जेराव महामूलकर**
**रा. सरदार पटेल वॉर्ड, वरोरा,**
**ता. वरोरा, जि. चंद्रपूर**
**संपर्क : ९५६१६६२०८९**



ज़िंदगी में अगर कुछ खोना पड़े तो डरना मत, क्योंकि खोकर ही मिलती है नई राहें और असली पहचान...

# कर्तृत्वाचा आवाज-पिशोरचा लोकनेता राजू मोकासे



संपादक
आशिष घुमे
e sahyandrinews@gmail.com



कधी कधी एखादी व्यक्ती पदावर नसल्यानं लहान वाटते,पण तीच व्यक्ती आपल्या कर्तृत्वाने हजारो मनांवर राज्य करत असते.राजेंद्र दगडू मोकासे, म्हणजेच राजू मोकासे सर, हे असंच एक नाव जे नाव गावापुरतं मर्यादित नाही, तर संघर्ष, समाजकार्य, शिक्षण आणि नेतृत्व या साऱ्या मूल्यांचं जिवंत प्रतीक आहे.

१० जुलै १९६९ रोजी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील पिशोर गावात त्यांचा जन्म झाला. घरातील आर्थिक स्थिती फारशी चांगली नव्हती. वडील दगडू मामा मोकासे हे छोटा-मोठा व्यापार करत असत. त्यांचा गावात चांगला मान होता, पण घरात सतत तुटवडा जाणवत असे. या परिस्थितीत वाढलेल्या राजू मोकासे यांचं बालपण म्हणजे जबाबदाऱ्या, कष्ट आणि संघर्षाची शाळा होती.बालवयातच त्यांचं मन समाजातल्या अडचणी, विषमता आणि अन्याय पाहून अस्वस्थ होत असे. शाळेत असतानाच त्यांनी अनेकदा गरीब विद्यार्थ्यांसाठी मोर्चे काढले, निवेदनं दिली आणि अन्यायाविरुद्ध आवाज उठवला. त्या वयात त्यांनी सामाजिक न्यायासाठी लढण्याची जी धडपड केली, तीच पुढे त्यांच्या आयुष्याची दिशा ठरली. १९८८ मध्ये, अवघ्या १९व्या वर्षी त्यांनी पिशोर गावात शिवसेनेची शाखा स्थापन केली. ही शाखा केवळ राजकीय नव्हती, तर समाजाभिमुख तरुणांचा एक विश्वासाचा मंच ठरली. तरुणांना एकत्र करून त्यांनी गावातील विविध प्रश्नांवर चर्चा, कार्यशिबीर, मोर्चे आणि जनजागृती मोहिमा राबवल्या. १९९१ मध्ये त्यांनी शिवसेनेच्या तिकिटावर जिल्हा परिषद निवडणूक लढवली. हा निर्णय त्यांच्या आत्मविश्वासाचं द्योतक होता. त्यांचा पराभव निसटता झाला, पण गावकऱ्यांच्या मनात त्यांनी अढळ स्थान मिळवलं.

१९९२ मध्ये त्यांनी जिल्हा परिषद शाळेत शिक्षक म्हणून नोकरी स्वीकारली. शिक्षण हे केवळ पुस्तकापुरतं मर्यादित नसावं, हे त्यांचं ठाम मत होतं. त्यामुळे त्यांनी विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व, मूल्य आणि सामाजिक भान यांची जाणीव निर्माण केली. खेळाच्या माध्यमातूनही त्यांनी विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण केला. कबड्डी, खो-खो, व्हॉलीबॉल, क्रिकेट अशा खेळांमधून विद्यार्थ्यांना शारीरिक आणि मानसिक बळ देण्याचा प्रयत्न केला. त्यांनी अनेक विद्यार्थ्यांना राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये भाग घेण्यासाठी प्रेरित केलं. मुख्याध्यापक पदावर असताना त्यांनी २०२० मध्ये राजीनामा दिला. त्यांच्या मते, समाजासाठी पूर्ण वेळ देणं हेच त्यांच्या जीवनाचं ध्येय होतं. हा निर्णय सोपा नव्हता. पण त्यांनी पद, स्थैर्य आणि सुरक्षितता यांचा त्याग करून सेवा आणि सामाजिक बांधिलकी यांना प्राधान्य दिलं. राजीनाम्यानंतर त्यांनी संपूर्ण वेळ समाजकार्यासाठी झोकून दिला.२०२०-२१ च्या ग्रामपंचायत निवडणुकीसाठी त्यांनी पॅनल उभं केलं. तीन उमेदवार विजयी झाले. ही विजयाची घोषणा नव्हे, तर जनतेच्या विश्वासाची मोहर होती. पॅनल उभं करणं म्हणजे स्थानिक नेतृत्वाची जबाबदारी स्वीकारणं. त्यांनी गावातील मूलभूत सुविधा, रस्ते, पाणी, स्वच्छता यासारख्या विषयांवर काम केलं. त्यांनी प्रशासनाकडे पाठपुरावा करून अनेक विकासकामे मार्गी लावली.कोरोना काळात राजू मोकासे सर यांनी आपल्या नेतृत्वाची खरी छाप सोडली. पिशोर गावात कोरोनाच्या भीतीमुळे भीषण वातावरण होतं. अशा वेळी त्यांनी गावातील प्रत्येक वाडा, गल्ली आणि सार्वजनिक जागांवर स्वतः उभं राहून कीनाटाशक फवारणी केली. केवळ निर्देश देणं नव्हे, तर त्यांनी स्वतः फवारणीच्या मोहिमेत सहभाग घेतला. गावात पाण्याची तीव्र टंचाई होती. सरकारी मदतीची वाट न पाहता स्वखर्चाने एक टँकर खरेदी केला आणि संपूर्ण गावाला मोफत पाणीपुरवठा केला. हा टँकर त्यांच्या समाजप्रेमाचं प्रतीक ठरला.कोरोनाच्या लॉकडाऊन काळात गरीब कुटुंबांना अन्नधान्याची मोठी अडचण होती. त्यांच्यासाठी स्वखर्चातून शेकडो किराणा किट वाटप केलं. या कृतीमुळे कित्येक कुटुंबांचा उदरनिर्वाह सुसह्य झाला.पिशोरच्या ग्रामीण रुग्णालयात रुग्णसेवेसाठी गाडीची गरज होती. त्यांनी प्रशासकीय अधिकाऱ्यांकडे सतत पाठपुरावा करून रुग्णवाहिका मिळवून दिली. ही गाडी आज गावात गरजूंना वेळीच उपचार मिळवून देण्यासाठी मदत करते.तसेच, दोन वर्षांपूर्वी पिशोर येथील गोसाई वाडा भागात प्रत्येक घरामध्ये पावसाचे पाणी शिरले होते. त्या वेळी राजू मोकासे सरांनी तत्काळ छत्रपती संभाजीनगर येथील जिल्हाधिकाऱ्यांशी संपर्क साधून त्यांना पिशोर येथे बोलावले. प्रशासन घटनास्थळी दाखल झाले आणि परिस्थिती नियंत्रणात आणली गेली. त्यानंतर काही काळातच पिशोर धरण भरल्यामुळे नळाला येणाऱ्या पाण्याला अत्यंत दुर्गंधीयुक्त व दुर्गुणयुक्त स्वरूप आले होते. यावर उपाय म्हणून त्यांनी स्वखर्चाने तब्बल १५ टँकर एक महिन्यापर्यंत मोफत गावात फिरवून शुद्ध पाणीपुरवठा केला. ही कृतीदेखील त्यांच्या संवेदनशील आणि जबाबदार नेतृत्वाची जाणीव करून देते.त्यांची पत्नी संगीता मोकासे या स्वतःही शिक्षिका आहेत. त्यांच्या कार्यात त्या खंबीर साथ देतात. त्यांना दोन मुले ऋषिकेश आणि ओम हेही सामाजिक जाणिवांमध्ये वाढत आहेत. त्यांचा एक भाऊ दिवंगत झाला आहे. त्यांचा संपूर्ण परिवार त्यांच्या कार्यात सामील आहे.

संकलन जावेद शेख, पिशोर

राजू मोकासे सर तरुणांना नेहमी सांगतात राजकारण हे समाजकारणाचं साधन आहे.ते तरुणांना राजकारणात यावं, विचारधारेतून समाज घडवावा, असं आवाहन करतात. त्यांची प्रत्येक भेट ही प्रेरणादायी असते. ते गावागावात फिरतात, लोकांच्या अडचणी ऐकतात, आणि त्यावर उपाय शोधतात.राजू मोकासे सर यांचे कार्य केवळ निवडणुकीपुरते मर्यादित नाही. ते निवडणुकीनंतरही गावातील कामांमध्ये सातत्याने सक्रिय राहतात. निवडणूक हा त्यांच्या दृष्टीने लोकांपर्यंत पोहोचण्याचा एक मार्ग आहे. एकदा निवडणूक पार पडली की, बहुतांश लोक मागे हटतात, पण राजू मोकासे सरांचा कार्यशैलीत फरक पडत नाही. ते सातत्याने गावात फिरत राहतात, नागरिकांच्या अडचणी ऐकतात, त्यावर उपाय शोधतात. योजनांची अंमलबजावणी, निधीचा वापर, आणि त्यावर नियंत्रण ठेवत कार्य सुरूच ठेवतात.विकासकामांबाबत ते अत्यंत पारदर्शक पद्धतीने काम करतात. प्रत्येक विकासकामाचा ताळेबंद ते ग्रामस्थांपुढे मांडतात. निधी कुठून आला, किती खर्च झाला, आणि काम कितपत पूर्ण झाले याची माहिती ते वेळोवेळी गावकऱ्यांना देतात. त्यामुळे जनतेचा त्यांच्यावर विश्वास वाढलेला आहे.

लोकशाही मूल्ये म्हणजे केवळ मत मागणं नव्हे, तर लोकांचा सन्मान राखणं आणि निर्णय प्रक्रियेत त्यांचा सहभाग वाढवणं. राजू मोकासे सर हे प्रत्येक निर्णयात ग्रामस्थांची मते विचारात घेतात. सभा, चर्चासत्रं यांच्यामार्फत गावकऱ्यांचा सहभाग वाढवण्यावर त्यांचा भर असतो.

गावातील प्रत्येक समस्या, ती लहान असो वा मोठी त्यांना ती महत्त्वाची वाटते. रस्त्यांची दुरवस्था, वीजपुरवठा, पाण्याची टंचाई, अपुऱ्या आरोग्य सुविधा यासाठी त्यांनी वेळोवेळी प्रशासनाकडे निवेदनं दिली, पाठपुरावा केला आणि अनेक कामांना गती दिली आहे. त्यांच्या दृष्टीने एकाही व्यक्तीची अडचण लहान नाही.

शिक्षण आणि खेळ हे त्यांच्या कार्याचे मुख्य आधारस्तंभ आहेत. शिक्षक म्हणून त्यांनी शिक्षण क्षेत्रात योगदान दिलंच, पण त्यांनी विद्यार्थ्यांना नेतृत्वगुण, सामाजिक बांधिलकी आणि आत्मविश्वास देण्यासाठी खेळांचा आधार घेतला. त्यांनी अनेक क्रीडास्पर्धा आयोजित केल्या आणि विद्यार्थ्यांना व्यासपीठ उपलब्ध करून दिलं.

संकटाच्या काळात कार्य करणं हे खऱ्या नेत्याचे लक्षण असतं. कोरोना महामारीच्या काळात, जेव्हा प्रत्येकजण स्वतःच्या सुरक्षेबाबत चिंतित होता, तेव्हा राजू मोकासे सरांनी जीव धोक्यात घालून गावात कीनाटाशक फवारणी केली. पाण्याच्या टंचाईला सामोरे जाताना स्वतः टँकर खरेदी करून पाणीपुरवठा केला. गरजू कुटुंबांना किराणा किट वाटप केले. आणि पिशोर ग्रामीण रुग्णालयासाठी गाडी मिळवण्यासाठी पाठपुरावा करून ती सेवा सुरू केली. ही सगळी उदाहरणं त्यांच्या संवेदनशीलतेची आणि समाजभानाची साक्ष देतात.

राजू मोकासे सर हे केवळ शिक्षक नाहीत, राजकीय कार्यकर्ते नाहीत, तर ते एक विचार आहेत जो विचार माणसाला माणूस समजतो, आणि समाजासाठी झिजणं हेच खरे कर्तृत्व मानतो. आज त्यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने त्यांना शुभेच्छा देताना, आपण त्यांच्या कार्याला, विचाराला आणि योगदानाला सलाम करत आहोत.

**न कर्मणामनारंभान्नैष्कर्म्यं पुरुषोऽश्नुते -भगवद्गीता**
**(कर्म टाळून कोणीही सिद्धीला पोहोचत नाही.)**
**हीच ओळ त्यांच्या जीवनाला सार्थ ठरवते. राजू मोकासे सर हे त्या गीतेच्या कर्मयोगाचा जिवंत नमुना आहेत.**








सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .